एस. वाय. बी. ए. – एस- १

# आत्मचरित्राचे स्वरूप व संकल्पना

## घटक – पहिला

प्रा.डॉ.महादेव कांबळे

एस. वाय. बी. ए. – एस- १

आत्मचरित्राचे स्वरूप व संकल्पना

घटक – पहिला

- ## प्रस्तावना

आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतः लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. आत्मचरित्राप्रमाणे इतरही अनेक लेखनप्रकारांनी असे दर्शन घडविता येते. त्यांत खाजगी पत्रव्यवहार, मुलाखती, दैनंदिनी, रोजनामे (जर्नल्स), ख्रिस्ती धर्मकल्पनेनुसार केलेली पापनिवेदने, स्मृतिचित्रे (रेमिनिसन्सेस) व संस्मरणिका (मेम्वार्स) यांसारखे आत्मचरित्रपर लेखनप्रकार अंतर्भूत होतात.

- आत्माविष्काराची मानवी प्रवृत्ती नैसर्गिक व सार्वत्रिक असल्याने आत्मचरित्रपर लेखन सर्वच भाषांत आढळून येते. एक साहित्यप्रकार म्हणून ज्यास आत्मचरित्र म्हटले जाते, ते आणि उपर्युक्त आत्मचरित्रपर लेखनप्रकार यांत फरक आहे. आत्मचरित्रामागे आत्माविष्काराची प्रेरणा, आत्मजीवनाच्या अर्थपूर्णतेची अभिज्ञता, स्वानुभवांतील निवडीची दृष्टी आणि लेखनशैलीविषयक भान अशा गोष्टी प्रेरक असतात. तसेच ऐतिहासिक साहित्यकृतीप्रमाणे विशिष्टतेकडून सामान्यत्वाकडे जाण्याची क्षमता त्यात असते. म्हणूनच आत्मचरित्र एक ललित गद्यप्रकार मानला जातो. खाजगी पत्रादी आत्मचरित्रपर लेखनप्रकार पुष्कळदा विशिष्ट व्यक्तींसाठी व विशिष्ट व्यक्तिगत संदर्भात हाताळले जातात.

# प्रसिद्ध आत्मचरित्र

- महात्मा गांधींचे - सत्याचे प्रयोग
- पंडित नेहरू – Toward Freedom
- शंकरराव खरात – तराळ अंतराळ
- आचार्य प्र.के. अत्रे - कर्हेचे  पाणी
- ए.पी.जे. अब्दुल कलाम – अग्निपंख
- यशवंतराव चव्हाण – कृष्णाकाठ
- आनंद यादव – झोंबी
- डॉ.प्रकाश आमटे – प्रकाशवाटा

# प्राचीन आत्मचरित्र

- प्राचीन मराठीतील त्रोटक, प्रासंगिक व नोंदीवजा आत्मकथन नामदेव-तुकारामादी संतांच्या काव्यात व अन्य काव्यग्रंथांच्या उपोद्‌घात-उपसंहारांत आढळते. तुकारामाचे अभंग म्हणजे एक प्रकारचे त्याचे आध्यात्मिक आत्मचरित्र होय. बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ यांसारख्यांच्या स्वतंत्र, प्रांजळ व भावोत्कट आत्मकथा काहीशा विस्तृत आहेत. वाङ्‌मयीन व ऐतिहासिक महत्त्व असलेली गद्य आत्मचरित्रे नाना फडणीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन व बापू कान्हो खांडेकर यांनी उत्तर पेशवाईत लिहिली. अव्वल इंग्रजी कालखंडात नोंदीवजा आत्मकथन विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांच्या वेदोक्त धर्मप्रकाशात (१८५९ – २५ वे प्रकरण) आढळते. वासुदेव बळवंतांच्या कैफियतीत (१८७९) त्यांची संक्षिप्त जीवनकहाणी आहे. दादोबा पांडुरंगांचे आत्मचरित्र (१८८२) व बाबा पदमनजींचे अरुणोदय (१८८८) ही या कालखंडातील दोन उल्लेखनीय आत्मचरित्रे होत.


# आत्मचरित्राचा हेतू

**आत्मचरित्रलेखनाचे हेतू -**

साधारणपणे प्रत्येक वाङ्मय प्रकाराच्या लेखनामागे कोणता ना कोणता हेतू डोळ्यांसमोर ठेवलेला असतो. आत्मचरित्र हाही एक वाङ्मय प्रकार असल्याने आत्मचरित्रलेखनाचे काही हेतू असलेले दिसतात. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैज्ञानिक, कला व क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांतील व्यक्तींनी आत्मचरित्रलेखन केलेले आहे. त्यामुळे नानाविध हेतूंनी आत्मचरित्रे लिहिली जात असतात.

कर्तृत्ववान व्यक्ती, महान तत्त्वज्ञ, नामवंत खेळाडू, ख्यातनाम साहित्यिक आणि कलावंत यांची आत्मचरित्रे ही मानव समाजाचा अनमोल खजिना आहे. ही आत्मचरित्रे भावी पिढ्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरत असतात. या व्यक्तींच्या जीवनकर्तृत्वापासून प्रेरणा घेऊन भावी पिढी आपल्या विकासाची वाटचाल करू

# आत्मचरित्राचे स्वरूप


आत्मचरित्राचे स्वरूप –

माणसाचे जीवन हा एक प्रवास आहे. या जीवन प्रवासात त्याला अनेक सखेसोबती भेटत असतात. जीवनात अनेक घटना-प्रसंगांना सामोरे जाताना विविध स्वरूपाचे अनुभव तो घेत असतो. हे अनुभव सुख-दुःख मिश्रीत असतात. आपल्या जीवन प्रवासातील सख्या-सोबत्याबद्दलचे आणि विविध अनुभवांविषयीचे आत्मनिवेदन लेखक आत्मचरित्रात करत असतो. आत्मचरित्रकाराने आत्मचरित्राची सुरुवात कोठून करावी, जीवनातील कोणत्या घटनांची निवड करावी, निवेदनाचा क्रम कसा असावा याबाबतचे स्वातंत्र्य आत्मचरित्रकाराला असते.

आत्मचरित्राच्या आकृतिबंधाविषयी निश्चित असे नियम नसतात. त्यामुळे आत्मचरित्राच्या मांडणीबाबत आत्मचरित्रकार पूर्णपणे बंधमुक्त असतो. याविषयी विलास खोले म्हणतात, "आत्मचरित्र हा काही काटेकोर नियमावलीचा अवलंब करणारा लेखन प्रकार नाही. येथे महत्त्व आहे ते व्यक्तिगत अनुभवाला. 'मी' ला त्याच्या भूतकालीन अनुभव आशय म्हणून योजण्याचे सर्वाधिकार या लेखनाने बहाल केलेले असतात."

# आत्मचरित्राच्या प्रेरणा

- हृदय हलके करणे
- बोध करणे
- जुन्या आठवणींना उजाळा देणे
- कबुलीजवाब
- आत्मसंमर्थन
- आत्मपरिक्षण
- आत्माविष्कार

निष्कर्ष –

१) चरित्र म्हणजे मानवी जीवनाचा पूर्वानुभव.

२) चरित्रकारापेक्षा चरित्र नायक हा महान असतो.

३) चरित्र ही ऐतिहासिक व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध आहे. चरित्रकाराला स्वत:च्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे अशक्य असते.

४) चरित्रनायक स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा एखादा अंश चरित्र नायकात प्रतित होणे शक्य असते. ती प्रतितीही अतिशय मर्यादित असते.

५) चरित्र विविध हेतूने निर्माण झाले असले तरी सत्यपूर्ण दर्शन हाच चरित्राचा वाङ्मयीन हेतू आहे असे मानता येईल.

६) चरित्र आणि आत्मचरित्र हा एकच प्रकार आहे असे मानले गेले परंतु काळानुरूप यांच्यामध्ये खूप बदल झालेले दिसून येतात. चरित्र हे वस्तुनिष्ठ आहे तर आत्मचरित्र आत्मनिष्ठ. आत्मनिवेदनाच्या प्रवृत्तीतून निर्माण झालेले लेखन आहे.

७) आत्मचरित्र म्हणजे लेखकाने आपल्या जीवनाचा प्रांजळपणे उलगडून दाखवलेला जीवनपट होय.

८) आत्मचरित्र म्हणजे प्रामाणिकपणे दिलेल्या जीवनकृतीचा कबुली जबाब आहे असे मानता येईल.

९) आत्मचरित्र ही लेखकाच्या आयुष्याच्या शेवटी लिहिली गेली आहेत.

१०) आत्मकथने ही एखादा अपवाद ओघळता बहुतेक आयुष्याच्या ऐन उमेदीत लिहिली गेली आहेत.

११) आत्मकथने ही समाजाचा इतिहास आणि दु:ख, हालअपेष्टा यांची वर्णने त्यात आलेली आहेत.

१२) आत्मकथनकार नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करणारा आहे.

१३) आत्मकथन व्यक्ती मनाचे असले तरी त्यातून त्याच्या समाजाचे दर्शन मोठ्या प्रमाणात घडते.

१४) आत्मकथा हा शब्द प्रयोग योग्य नाही कारण कथेला शेवट असतो. आणि कथन हे सातत्याचे प्रतिक आहे म्हणून आत्मकथन ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण आहे.